# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

## स्वतंत्र भारताचे आतापर्यंतचे उपराष्ट्रपती – १९५२ ते २०२३

| निवडणुक वर्षे | विजयी उमेदवार (उपराष्ट्रपती) | प्राप्त मते | प्रमुख प्रतिस्पर्धी | प्राप्त मते % |
|---|---|---|---|---|
| 1952 | डॉ.एस.राधाकृष्णन | - | बिनविरोध | - |
| 1957 | डॉ.एस.राधाकृष्णन | - | बिनविरोध | - |
| 1962 | डॉ.झाँकीर हुसेन | 568 | एन. सामंत सिंह | 14 |
| 1967 | व्ही.व्ही.गिरी | 468 | प्रो. हबीब | 192 |
| 1969 | जी.एस.पाठकक | 400 | एच.व्ही.कामथ | 156 |
| 1974 | बी. डी. जत्ती | 521 | एन. ई. व्होरो | 141 |
| 1979 | एम. हिदायतुल्ला | - | बिनविरोध | - |
| 1984 | आर.वेंकटरमण | 508 | बी.सी.कांबळे | 207 |
| 1987 | डॉ.शंकर दयाल शर्मा | - | बिनविरोध | - |
| 1992 | के.आर.नारायणन् | 700 | काका जोगिंदरसिंह | 1 |
| 1997 | के.कृष्णकांत | 441 | सुरजीतसिंह बर्नाला | 273 |
| 2002 | भैरवसिंह शेखावत | 454 | सुशीलकुमार शिंदे | 305 |
| 2007 | मोहम्मद हमीद अन्सारी | 425 | नजमा हेपतुल्ला | 222 |
| 2012 | मोहम्मद हमीद अन्सारी | 490 | जयवंत सिंह | 238 |
| 2017 | मोप्पावरपू व्यंकय्या नायडू | 516 | गोपाळकृष्ण गांधी | 244 |
| 2022 | जगदिप धनखड | ... | मार्गारेट अल्वा | ... |

31/71

## 13. पंतप्रधान व मंत्रिमंडळ
## भाग V कलम 74, 75 व 78

- **स्वीकार** - इंग्लंड
- देशाचा वास्तविक प्रमुख असतो. लोकसभेचा नेता असतो.
- **पंतप्रधान अध्यक्ष** - निती आयोग, राष्ट्रीय विकास परिषद, राष्ट्रीय एकात्मता परिषद, आंतरराज्यीय परिषद, राष्ट्रीय जलसंपदा परिषद, राष्ट्रीय लोकसंख्या आयोग. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधीकरण.
- **कलम 74** - राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्याकरता मंत्रिमंडळ असेल.
- **कलम 74(1)** - राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल.राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने कार्य करतील.
- **कलम 74(2)** - मंत्र्यांनी राष्ट्रपतीस दिलेला सल्ला न्यायप्रविष्ठ नसेल.
- **कलम 75** - मंत्र्यासंबंधी अन्य तरतुदी.
- **कलम 75(1)** - पंतप्रधानाची राष्ट्रपतीकडून नियुक्ती केली जाईल तर इतर मंत्र्यांची राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्ल्याने नियुक्ती करतील.
- **कलम 75(1A)** - केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या
- **कलम 75(1B)** - संसदेचा सदस्य पक्षांतर बंदी कायद्याअंतर्गत अपात्र असेल तर मंत्री होण्यास देखील अपात्र असेल. (91 वी घटनादुरुस्ती 2003 नुसार समावेश.)
- **कलम 75(2)** - राष्ट्रपती मर्जी असेपर्यंतच मंत्री पदावर असतील.
- **कलम 75(3)** - मंत्रिमंडळ सामुदायिकपणे लोकसभेस जबाबदार असेल.
- **कलम 75(4)** - राष्ट्रपती मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील.
- **कलम 75(5)** - मंत्री म्हणून निवड झाल्यापासून 6 महिन्याच्या आत त्यांना संसदेचे सदस्यत्व प्राप्त करावे लागते अन्यथा मंत्रिपद संपुष्टात येईल.
- **कलम 75(6)** - मंत्र्यांचे वेतन व भत्ते संसद कायद्याद्वारे वेळोवेळी निर्धारित केले जातील.
- **पंतप्रधानाची पात्रता** - भारताचा नागरिक. वयाची 25 वर्षे पूर्ण.
- **नेमणूक** - कलम 75(1) अन्वये राष्ट्रपतीकडून केली जाते.

**या संदर्भात दोन महत्त्वपूर्ण निर्णय -**

राष्ट्रपती त्यास अगोदर पंतप्रधान म्हणुन नेमणुक करतील आणि ठरावीक कालावधीत बहुमत सिद्ध करण्यास सांगतील.

**2) सर्वोच्च न्यायालय - 1970 :** संसदेच्या कोणत्याही सदनाचा सदस्य नसलेल्या व्यक्तीस राष्ट्रपती पंतप्रधान म्हणुन नेमणूक करतील मात्र त्याने 6 महिन्याच्या आत कोणत्याही एका सदनाचे सदस्यत्व प्राप्त करणे महत्त्वाचे असते अन्यथा पद संपुष्टात येते.

- **शपथ -** राष्ट्रपती पंतप्रधानांना केंद्रीय मंत्री म्हणुन पद आणि गोपनियतेची शपथ देतात.
- **कार्यकाल -** पंतप्रधानाचा कार्यकाल घटनेत निश्चित नाही तरीही ते राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत किंवा सर्वसाधारण 5 वर्ष पदावर असतात किंवा लोकसभेत समर्थन गमवल्यास राष्ट्रपतीकडे राजीनामा देतात. तसेच राष्ट्रपती तत्पुर्वी पदावर दुर करु शकतात.

**पंतप्रधानाचे अधिकार व कार्ये -**

**1) मंत्रिमंडळ संदर्भात -**

- राष्ट्रपती केवळ अशाच व्यक्तीची निवड मंत्री म्हणुन करतात ज्याची शिफारस पंतप्रधानाने केलेली असते.
- मंत्र्यांना खातेवाटप करणे व त्यात फेरबदल करणे.
- कॅबिनेट मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.
- आपल्या पदाचा राजीनामा देऊन मंत्रिमंडळ बरखास्त करणे.

**2) राष्ट्रपती संदर्भात -**

- कलम 74, 75, 78 ही कलमे राष्ट्रपती पंतप्रधान यांच्यातील संबंध दर्शवितात.
- राष्ट्रपती व मंत्रिमंडळ यांना जोडणारा दुवा म्हणुन काम करणे.
- मंत्रिमंडळाचे सर्व निर्णय विधी विधानाचे प्रस्ताव राष्ट्रपतींना 14 दिवसांच्या आत कळवणे.

**3) संसदेच्या संदर्भात -**

- पंतप्रधान लोकसभेचा नेता म्हणुन विविध भुमिका पार पाडतो.
- संसदेचे अधिवेशन बोलावणे, समाप्त करणे यासाठी राष्ट्रपतीला सल्ला देनात.
- लोकसभा विसर्जीत करण्याचा राष्ट्रपतीला सल्ला देणे.

**पंतप्रधानाबाबचे अभिप्राय -**

- **रॅम्से मूर -** राज्यरुपी जहाजाचा चालक असतो.
- **लॉर्ड मोर्ले -** पंतप्रधान समानांमधील पहिला असतो.
- **जेनिंग्ज -** पंतप्रधान ग्रह ज्याच्या भोवती फिरतात असा सूर्य असतो.
- **मन्रो -** पंतप्रधान राज्यरुपी जहाजाचा कॅप्टन असतो.
- **सर विल्यम हरकोर्ट -** पंतप्रधान गौण ताऱ्यामधील चंद्र असतो.
- **डॉ. आंबेडकर -** भारताच्या पंतप्रधानाची तुलना अमेरिकन राष्ट्राध्यक्षाबरोबर केलेली योग्य होईल.

- **भारतरत्न प्राप्त पंतप्रधान -**
  1. पंडित नेहरू
  2. गुलजारीलाल नंदा
  3. इंदिरा गांधी
  4. मोरारजी देसाई
  5. राजीव गांधी
  6. अटल बिहारी वाजपेयी
- **मुख्यमंत्री पदावरून पंतप्रधान झालेले -**
  1. मोरारजी देसाई (मुंबई प्रांत)
  2. चौधरी चरणसिंग (उत्तर प्रदेश)
  3. व्ही. पी. सिंग (उत्तर प्रदेश)
  4. पी. व्ही. नरसिंगराव (आंध्र प्रदेश)
  5. एच. डी. देवीगौडा (कर्नाटक)
  6. नरेंद्र मोदी (गुजरात)
- **सर्वाधिक काळ पंतप्रधान राहिलेले -** पंडित नेहरू (17 वर्ष)
- **सर्वात कमी काळ पंतप्रधान राहिलेले -** अटल बिहारी वाजपेयी (13 दिवस)
- **पदावर असताना मृत्यू पावलेले पंतप्रधान**
  1. पंडित नेहरू
  2. लाल बहादूर शास्त्री
  3. इंदिरा गांधी
- **हंगामी पंतप्रधान झालेले एकमेव -** गुलझारीलाल नंदा
- **सर्वात तरूण पंतप्रधान -** राजीव गांधी (40 वर्ष)
- **सर्वात वयोवृद्ध पंतप्रधान -** मोरारजी देसाई (79 वर्ष)
- **पहिले गैर काँग्रेस पंतप्रधान -** मोरारजी देसाई
- **लोकसभेत एकही दिवस न गेलेले पंतप्रधान -** चौधरी चरण सिंग
- **राज्यसभा सभागृहाचे सदस्यत्व प्राप्त करून पंतप्रधान झालेले**
  1. इंदिरा गांधी
  2. एच. डी. देवगौडा
  3. इंद्रकुमार गुजराल
  4. डॉ. मनमोहन सिंग
- **नरेंद्र दामोदरदास मोदी -** देशाचे व्यक्ती म्हणून 15 वे तर पद म्हणून 22 वे पंतप्रधान आहेत.
- **जय जवान जय किसान -** लालबहादूर शास्त्री
- **आराम हराम हैं -** पंडित नेहरू
- **जय जवान जय किसान जय विज्ञान -** अटल बिहारी वाजपेयी
- **डिस्कवरी ऑफ इंडिया -** पंडित नेहरू
- **ऑपरेशन ब्लू स्टार -** इंदिरा गांधी
- **माहिती तंत्रज्ञानाची सुरूवात -** राजीव गांधी
- **नोटाबंदी करणारे पंतप्रधान -**
  1. मोरारजी देसाई (1979)
  2. नरेंद्र मोदी (8 नोव्हेंबर, 2016)

**पंतप्रधानाचे कार्य (कलम 78) -**

- राष्ट्रपती अशा व्यक्तीची निवड मंत्री म्हणून करतात ज्याची शिफारस पंतप्रधानाने केलेली असते.

- मंत्र्यांना खाते वाटप करणे व त्यात फेर बदल करणे.
- मंत्री मंडळाच्या बैठकीचे अध्यक्ष स्थान भुषविणे
- स्वत: राजीनामा देऊन मंत्री मंडळ बरखास्त करणे.
- लोकसभा विसर्जित करण्याचा राष्ट्रपतींना सल्ला देणे
- संसेदेचे अधिवेशन भरविणे व स्थगित करणे याबाबत राष्ट्रपतींना सल्ला देणे
- मंत्रीमंडळ व राष्ट्रपती यांना जोडणारा दुवा म्हणून काम करणे.
- मंत्रीमंडळाने घेतलेले निर्णय 14 दिवसाच्या आत राष्ट्रपतींना कळविणे
- सभागृहात शासनाचे धोरणे जाहीर करणे.
- **पुढील नेमणुकाबाबत राष्ट्रपतींना सल्ला देणे -**
  1. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य
  2. राष्ट्रीय वित्त आयोगाचे अध्यक्ष व सदस्य
  3. केंद्रीय निवडणूक आयोगाचे अध्यक्ष व सदस्य
  4. भारताचा महालेखापरिक्षक
  5. भारताचा महान्यायवादी



**भारतातील आतापर्यंतचे पंतप्रधान - 1947-2023**

| क्र. | पंतप्रधानांचे नाव | वर्षे | पक्ष |
|---|---|---|---|
| 1. | पंडित नेहरु | 1947-1964 | काँग्रेस |
| 2. | गुलजारीलाल नंदा | 27 मे ते 9 जुन 1964 | हंगामी (काँग्रेस) |
| 3. | लाल बहादूर शास्त्री | 1964 ते 1966 | काँग्रेस |
| 4. | गुलजारीलाल नंदा | 11 ते 24 जानेवारी, 1966 | हंगामी (काँग्रेस) |
| 5. | इंदिरा गांधी | 1966 ते 1967- 1967 ते 71 | काँग्रेस |
| 6. | इंदिरा गांधी | 1971 ते 1977 | काँग्रेस (आय) |
| 7. | मोरारजी देसाई | 1977 ते 1979 | जनता पार्टी |
| 8. | चौधरी चरणसिंग | 1979 ते 1980 | जनता पार्टी |
| 9. | इंदिरा गांधी | 1980 ते 1984 | काँग्रेस (आय) |
| 10. | राजीव गांधी | 1984 ते 1989 | काँग्रेस (आय) |
| 11. | व्ही.पी.सिंग | 1989 ते 1990 | राष्ट्रीय आघाडी |
| 12. | चंद्रशेखर | 1990 ते 1991 | राष्ट्रीय आघाडी |
| 13. | पी.व्ही.नरसिंगराव | 1991 ते 1996 | काँग्रेस (आय) |
| 14. | अटलबिहारी वाजपेयी | 18 ते 1966 ते 1 जुन, 1996 | भाजपा (13 दिवस) |
| 15. | एच.डी.देवेगौडा | 1996 ते 1997 | संयुक्त आघाडी |
| 16. | इंद्रकुमार गुजराल | 1997 ते 1998 | संयुक्त आघाडी |
| 17. | अटलबिहारी वाजपेयी | 1998 ते 1999 | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |
| 18. | अटलबिहारी वाजपेयी | 1999 ते 2004 | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |
| 18. | डॉ.मनमोहन सिंग | 2004 ते 2014 | संयुक्त आघाडी |
| 19. | नरेंद्र दामोदरदास मोदी | 26 May 2014 ते 2019 | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |
| 20. | नरेंद्र दामोदरदास मोदी | 30 मे, 2019 पासून.... | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |